नियमित दिवाणी दावा क्र. ३९/२०१९
कडुशा –वि– यासीन शेख
निशाणी क्र. २७ लगत

## उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. एस. एस. चौधरी यांच्याद्वारे

०५. मला साक्ष देण्यासंदर्भात न्यायालयामार्फत साक्षी समन्स प्राप्त झालेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, केवळ वादीच्या सांगण्यावरुन मी आज साक्ष देत आहे. माझ्या म्हणण्याप्रमाणे सन २०११ मध्ये जी विहीर खोदण्यात आली होती ती विहीर खोदण्यासंदर्भात लेखी करारनामा झाला नव्हता. माझ्या मालकीची गट क्र. २०७ ही मिळकत दावा मिळकतीलगत नाही. माझी मिळकत दावा मिळकतीपासून अंदाजे एक ते दिड कि.मी. अंतरावर आहे. फेरफार क्र. ९९६ मंजुर झाल्याबाबत मला माहिती देण्यात आली नव्हती.

०६. प्रश्नः विहीरीची चतुःसिमा सांगता येईल का?

उत्तरः विहीर नदीत आहे त्यामुळे मला चतुःसिमा सांगता येणार नाही.

हे मला सांगता येणार नाही की, गट क्र. ५ मध्ये एकुण किती विहीरी आहेत. माझ्या म्हणण्याप्रमाणे विहीरीच्या उत्तर दिशेस नदी आहे. हे म्हणणे खरे नाही की, विहीरीच्या उत्तर दिशेस प्रतिवादी यासीन याची जमीन आहे. नदीच्या उत्तर दिशेच्या काठास लागुन प्रतिवादी यासीन याची जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीने खर्च करुन विहीर खोदली नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीने त्यावर कोणताही विद्युत पंप बसवलेला नाही.

०७. मला वादी क्र. २ राजुशा याच्या नावाच्या फेरफाराबद्दल काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या सांगण्यावरुन मी खोटी साक्ष देत आहे. पोलीसांनी माझ्याकडे चौकशी केली नव्हती. पोलीसांनी इलेक्ट्रीक मोटार काढण्याच्या अनुषंगाने माझ्याकडे विचारणा केली नव्हती. माझ्या म्हणण्याप्रमाणे गावातील सर्व लोकांनी प्रतिवादीस समजावुन सांगितले, प्रतिवादीने वादीची विनंती धुडकावुन लावली ही जी घटना घडली होती ती अंदाजे १२ ते १३ वर्षांपुर्वी घडली होती. हे म्हणणे खरे नाही की, अशी कोणतीही घटना

घडली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या सांगण्यावरुन मी त्याबाबत खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, विहीरीशी वादीचा संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, विहीर ही केवळ प्रतिवादी क्र. १ च्या मालकीची आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वाक्षरीत/–

(मयुरेश आर. काळे)

दिनांकः ०७.०७.२०२५

दिवाणी न्यायाधीश क. स्तर

भोकरदन